प्रेसनोट दिनांक २८/१२/२०१८

**सज्जा हरडफ ता.हदगांव जि. नांदेड येथील तलाठी, बालाजी व्यंकटराव पन्नमवार, यांनी ४,५००/—रु. लाचेची मागणी करून ति स्विकारल्यानंतर नांदेड लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड येथील अधिकाऱ्यांनी रंगेहात पकडले**

यातील तक्रारदार यांनी दिनांक २०/१२/२०१८ रोजी कार्यालय पोलीस उप अधिक्षक, लाचलूपत प्रतिबंधक विभाग नांदेड येथे तक्रार दिली की, " त्यांची वडीलोपार्जीत जमीन तक्रारदार यांचे वडीलांचे नावे फेरफार करण्यासाठी सज्जा हरडफ ता. हदगांव येथील तलाठी, पन्नमवार यांनी ५,०००/—रू. ची लाचेची मागणी करीत असल्याची तक्रार दिली".

सदर तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड कार्यालयाकडुन आज दिनांक २८/१२/२०१८ रोजी बाजार गल्ली हदगांव येथील तलाठी यांचे खाजगी कार्यालयाचे परिसरात पंचासमक्ष केलेल्या लाच मागणी पडताळणी मध्ये तक्रारदाराचे वडीलोपार्जीत जमीन तक्रारदार यांचे वडीलांचे नावे फेरफार करण्यासाठी तलाठी पन्नमवार यांनी तक्रारदार यांचेकडे ४,५००/—रुपये लाचेची मागणी करून लाच स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.

आज दिनांक २८/१२/२०१८ रोजी बाजार गल्ली हदगांव येथील तलाठी पन्नमवार यांचे खाजगी कार्यालयाचे परिसरात लावण्यात आलेल्या सापळयामध्ये आरोपी लोकसवक पन्नमवार, तलाठी यांनी तक्रारदार यांचे वडीलोपार्जीत जमीन तक्रारदार यांचे वडीलांचे नावे फेरफार करण्यासाठी पंचा समक्ष ४,५००/—रू. लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर त्यांना लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडण्यात आले आहे.

प्रस्तुत प्रकरणी पोलीस स्टेशन हदगांव जि.नांदेड येथे आरोपी लोकसेवक बालाजी व्यंकटराव पन्नमवार, वय ५२ वर्ष, तलाठी नेमणुक सज्जा हरडफ ता.हदागवं जि. नांदेड यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध (संशोधन) अधिनियम २०१८ नुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

तरी सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणीचे मोबाईल फोनवर लोकसेवक यांचे एसएमएस किंवा व्हिडीओ, ऑडीओ क्लिप असल्यास, भ्रष्टाचार संबधाने कांही माहिति असल्यास किंवा माहिती अधिकारात शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी शासकीय निधीचा भ्रष्टाचार केला असेल तर खालील क्रमांकावर संपर्क करावा.

१) टोलफ्री हेल्पलाईन क्रमांक :— १०६४ (२) कार्यालयाचा फोन क्रमांक ०२४६२—२५३५१२
३) श्री विजय डोंगरे, पो.उप अधि.यांचा मोबाईल क्रमांक ८९७५७६९९१८

Website :- www.acbmaharashtra.gov.in, Mobile App :- www.acbmaharashtra.net
Facebook Page :- www.facebook.com/MaharashtraACB

कार्यालय,पोलीस उप अधिक्षक ला.प्र.वि.नांदेड,युनिट

सविनय सादर

( विजय डोंगरे )
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड.